दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

## बॉक्सिंग फेडरेशनच्या अध्यक्षपदाचा वाद

**मुंबई**-राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर येत असून, बॉक्सिंग फेडरेशनच्या अध्यक्षपदाचा वाद आता चांगलाच पेटला आहे. या पदावरून भाजप नेते प्रवीण दरेकर आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते राहुल शेवाळे यांच्यात थेट संघर्ष पाहायला मिळत आहे. प्रवीण दरेकर यांनी राहुल शेवाळे यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत या वादात उडी घेतली आहे. आम्ही काही लपून-छपून निवडणूक लढवलेली नाही, एकदा झालेली निवडणूक पुन्हा कशी काय होऊ शकते? असा सवाल उपस्थित करत दरेकर यांनी राहुल शेवाळे यांच्या आरोपांना 'चोराच्या उलट्या बोंबा' असे संबोधले आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर, राहुल शेवाळे यांनी नितीन गडकरी यांची दिशाभूल केल्याचा दावाही दरेकर यांनी केला आहे.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • शनिवार दि.४ एप्रिल २०२६ • अंक-८१ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# अवकाळीग्रस्तांना दिलासा!

## पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश-चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती

**नागपूर । प्रतिनिधी**

मराठवाडा, विदर्भ आणि राज्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचेही आदेश मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना दिले आहेत, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. सर्वेक्षण करत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाईल.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अशोक खरात प्रकरणात पोलिसांकडून सर्व बाजूने योग्य तपास सुरू आहे. पोलिसांकडे जी माहिती येते आहे त्या आधारावर पोलिस काम करत आहे. कोणाकडे अजून काही माहिती असेल त्यांनी जर ती पोलिसांना दिली तर तपासाला चालना मिळेल. या प्रकरणी संपूर्ण चौकशी पारदर्शकपणे सुरू आहे. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी कोणालाही सोडणार नाही असे सांगितले आहे.

**खरात प्रकरणी चौकशी सुरू**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, खरात प्रकरणी एसआयटी चौकशी सुरू आहे. त्यांना जे जमीनीचे गैरव्यवहार दिसून येतील त्यानंतर त्यावर आम्ही चौकशी करू. पोलिस तपास सुरू असताना दुसऱ्या चौकशा लावणे योग्य नाही.

**यापुढे कोणाला गैरफायदा घेता येणार नाही**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, लाडकी बहीण योजनेचा काही लोकांनी गैरफायदा घेतला असेल तर शासन ते शोधून काढते. नंतर मात्र त्यांना लाभ होणार नाही. काही लोकांनी योजनेचा गैरफायदा घेतला तसा घ्यायला नको होता पण यापुढे त्यांना लाभ मिळणार नाही. राष्ट्रवादी अजित पवार पक्षातील गोष्टींबद्दल मला काही माहिती नाही, असे म्हणत त्यांनी सुनेत्रा पवारांनी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रावर बोलणं टाळले.

**राहुल गांधींवर टीका**

राहुल गांधी यांना 'वंदे मातरम'चा नेमका अर्थही माहित नाही. त्यांनी हे राष्ट्रगीत कधी मनापासून वाचले नाही आणि समजून घेण्याचा प्रयत्नही केला नाही. वस्तुस्थिती तर अशी आहे की, त्यांना 'वंदे मातरम'च्या चार ओळीही नीट म्हणता येत नाहीत, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर राष्ट्रभक्तीच्या मुद्द्यावरून तीव्र शब्दांत निशाणा साधला आहे.



## प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्याच्यावर गुन्हे नोंद करण्याची प्रकल्पग्रस्त हरिभाऊ पाटील यांची मागणी

**पनवेल । प्रतिनीधी**

प्रकल्पग्रस्तांचे भूखंड विकासकाच्या घशात घालून त्यांच्यावर अन्याय करत त्यांना रस्त्यावर आणून त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करून त्यांचे निलंबन करावे अशी मागणी प्रकल्पग्रस्त हरिभाऊ जानू पाटील यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे केली आहे. सिडकोने नवी मुंबई प्रकल्पासाठी पनवेल, ठाणे आणि उरण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केल्या. आणि त्यांच्या मोबदल्यात भूमिहीन झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सिडकोने उदरनिर्वाहासाठी १२.५ टक्क्याचा भूखंड दिला. पण हा भूखंड ३७ वर्ष होऊनही अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळाला नाही. रोडपाली येथील प्रकल्पग्रस्त हरिभाऊ जानू पाटील यांना आपल्या जमिनीच्या मोबदल्यात ८५० चौ. मीटरचा भूखंड मिळाला होता. पण त्यातील ४८० चौ मीटरचा भूखंड सिडको अधिकाऱ्याने प्रकल्पग्रस्त हरिभाऊ पाटील यांच्या अज्ञान पणाचा फायदा घेऊन परस्पर बाळकृष्ण बारक्या सुतार यांना विकला. याला दुजोरा देणारा अहवाल सिडको दक्षता विभागाने



मुख्य भूमी व भूमापन अधिकारी यांना सादर केलेला आहे. असे असताना आणि २००९ पासून आपला भूखंड मिळावा म्हणून हरिभाऊ पाटील सिडकोची दारे झिजवत आहेत. कोर्ट कचेरी करत आहेत. पण सिडको प्रशासन लक्ष द्यायला तयार नाहीत. शेवटी हरीभाऊ पाटील आणि त्यांचा मुलगा सुनील पाटील यांनी लोक आयुक्त यांच्याकडे न्याय मागितला आहे. लोक आयुक्त यांनी तातडीने याची दखल घेऊन सिडको कडून या प्रकरणाचा अभिप्राय मागितला आहे. पण सिडको कडून विकासकाला मदत करताना ओघाम उत्तरे देऊन लोक आयुक्तांची दिशाभूल करत आहेत.मा. लोक आयुक्त कार्यालयास मोघाम निर्णय व अभिप्राय पाठवुन गैर जिम्मेदारीचे प्रदर्शन करताना निवृत्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करता येत नाही असे दक्षता विभाग यांनी प्रकल्पग्रस्त हरिभाऊ पाटील यांना लेखी निवेदनाने कळविले आहे. मग निवृत्तीवर आलेल्या एखाद्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांचा भूखंड परस्पर विकासकाला विकला आणि तो निवृत्त झाला. तर गुन्हेगार होत नाही असाच अभिप्राय सिडकोने दिला आहे. प्रकल्पग्रस्तांचे भूखंड परस्पर विकून अनेक प्रकल्पग्रस्तांना सिडको अधिकाऱ्याने रस्त्यावर आणले आहे. त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करत आहेत. प्रकल्पग्रस्तांना भूखंड मिळू नयेत, त्यांना न्याय मिळु नये म्हणुन संबंधीत विभागाचे अधिकारी जाणीव पुर्वक गैरकाम करत आहेत. अशा अधिकारांची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करून त्यांना सेवेतून निलंबित करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येऊन अनेक प्रकल्पग्रस्तांचे उध्वस्त संसार वाचवावे अशी विनंती प्रकल्पग्रस्त हरिभाऊ जानू पाटील आणि सुनील पाटील यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे केली आहे.

## एलपीजी गॅस तुटवड्या मुळे आता रेशन कार्ड ग्राहक यांना केरोसीन मिळणार!



**ढाणकी । प्रतिनिधी**

अमेरिका, इजराइल, व इराण यांच्यात सलग एक महिना लोटून गेला असला तरी, अद्याप सुद्धा युद्धजन्य परिस्थिती कायम आहे.या परिस्थितीच्या झळा भारत देशातच नव्हे तर अन्य देशात सुद्धा याचे परिणाम दिसून येत आहेत.तसेच युद्धजन्य परिस्थितीमुळे एलपीजी गॅसच्या तुटवड्यावर उपाय म्हणून केंद्र सरकारने १२/३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये रेशन दुकानमधून( डीलर) याना केरोसीन (रॉकेल) रेशन ग्राहक याना वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यात आता केरोसीन मिळणार आहे. तसेच महाराष्ट्र सरकारने ३७ लाख ४४ हजार लिटर रॉकेल वाटपास मंजुरी दिली आहे. त्यामुळे उमरखेड तहसीलचे तहसीलदार सुरडकर यानी तसे पत्रक जारी करून तालुक्यातील किरकोळ,होलसेलर सेमी होलसेलर परवाना धारक याना पत्रकाद्वारे परवाना नूतनीकरण करण्यासाठी आदेश दिले आहे, तात्काळ उमरखेड तहसील कार्यालयास डीलर यांनी परवाना सादर करावा, केरोसीन वाटप करण्यास इच्छुक नसल्यास तसे देखील लेखी स्वरूपात तहसील कार्यालयास कळवावे,तसेच सदर मूळ परवानाधारक मयत असल्यास वारसा आधारे परवाना वर्ग करून प्रस्ताव सादर करण्यात यावे,ही प्रक्रिया काल मर्यादित असल्यामुळे अर्जाचा परवाना नूतनीकरण बाबत तसेच वारस प्रक्रिये बाबत कुठल्याही प्रकारचा विचार करण्यात येणार नाही याची सर्व किरकोळ होलसेल, सेमी होलसेल, परवाना धारक (डीलर )यांनी याची नोंद घेण्यात यावी असे आव्हान उमरखेड चे तहसीलदार मा. राजू सुरडकर साहेब यांनी परवाना धारक याना केले आहे.

# बाणेर येथिल आपुलकी कॅन्सर व हृदयविकार हेल्थ केअर सेंटरला बाबूराव चांदेरे यांची भेट

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे महापालिके अंतर्गत बाणेर मध्ये सूरू झालेल्या कॅन्सर व हृदयविकार सेन्टरमुळे सर्व सामान्य जनतेला दिलासा/ या बाणेर सेंटर रूग्णालयाचा सेवांचा प्रसार करण्यासाठी बाबूराव चांदेरे यांनी पुढाकार घेतला / गरजू गरीब आणि सर्वसामान्य रूग्णांना अतिशय कमी खर्चाची सूविधा






पुणे महापालिका अंतर्गत सुरू झालेल्या बाणेर येथिल अपुलकी कॅन्सर व हृदयविकार हेल्थ केअर सेंटरला महापालिकेचे प्रभाग ९ मधील नगरसेवक बाबूराव चांदेरे यांनी भेट दिली सर्वसामान्य नागरिकांना परवडणा-या दरात उ-तम कॅन्सर व हृदयविकार उपचार उपलब्ध व्हावे म्हणून बाबूराव चांदेरे यांनी रूणालयाच्या सेवांचा प्रसार करण्यासाठी पुढाकार घेतला तसेच कॅन्सर तज्ञ डॉक्टर प्रतिश मुनोत यांनी गरजू रूग्णांना अतिशय कमी खर्चात तपासणी दर तसेच कॅन्सर साठी लागणारे कीमोथेरपी रेडिएशन या सूविधा योग्य खर्चात दिल्या जाणार असल्याची माहिती दिली अपुलकी कॅन्सर व हृदयविकार हेल्थ केअर सेंटर मध्ये अत्याधूनिक सुविधा व अनूभवी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सामान्य नागरिकांना सेवा दिल्या जात असल्याचे डॉ मुनोत यांनी सांगितले.

# धुनकवाडच्या मातीतलं प्रेम मनात कायमचं घर करून गेलं–नवनाथ बन

## धुनकेश्वर नगरीच्या मातीत अनुभवलेलं प्रेम अविस्मरणीय

**बीड । शंकर जाधव**

धारूर तालुक्यातील धुनकवाड येथे दिलेल्या भेटीदरम्यान ग्रामस्थांनी केलेल्या आत्मीय स्वागताने भारावून गेल्याची भावना भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यातील धुनकवाडच्या मातीत अनुभवलेलं प्रेम मनात कायमचं घर करून गेलं, असे त्यांनी आपल्या फेसबुक पोस्टद्वारे नमूद केले.



नवनाथ बन यांच्या धुनकवाड भेटीवेळी ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात व जल्लोषात त्यांचे स्वागत केले. गावात वाजत-गाजत मिरवणूक काढत फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. धुनकवाड ग्रामपंचायत कार्यालयात त्यांच्या भेटीदरम्यान सरपंच भागवत गव्हाणे स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला.यानंतर सरपंच भागवत गव्हाणे यांच्या निवासस्थानी भेट दिली असता मातोश्रींनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून त्यांचे स्वागत केले. या स्नेहपूर्ण आणि आत्मीय आदरातिथ्यामुळे नवनाथ बन भावूक झाले.ग्रामस्थांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्यांनी उपस्थितांशी संवाद साधत गावकऱ्यांच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गावाच्या विकासासाठी सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.या प्रसंगी भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी, भाजपा सोशल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश गाडे, सरपंच भागवत गव्हाणे यांच्यासह भाजप पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौलमध्ये सुक्या चाऱ्याची भीषण टंचाई

## पशुपालक अडचणीत, दूध उत्पादन घटले

**अलिबाग । ओमकार नागावकर**

अलिबाग तालुक्याला लाभलेला विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि पर्यटन व्यवसायामुळे ओळख असली तरी येथील अनेक कुटुंबांचे प्रमुख उत्पन्न स्रोत शेती आणि पशुपालन आहे. मात्र, मागील काही दिवसांपासून सुक्या चाऱ्याच्या भीषण टंचाईमुळे पशुपालकांवर मोठे संकट ओढवले आहे. सतत बदलणारे वातावरण, अवकाळी पाऊस आणि अनियमित हवामानामुळे चाऱ्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. परिणामी, सध्या सुक्या चाऱ्याची तीव्र कमतरता जाणवत असून पशुपालक चिंताग्रस्त झाले आहेत.



पुरेसा व पौष्टिक चारा उपलब्ध नसल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होत असून त्याचा थेट परिणाम दूध उत्पादनावर होताना दिसत आहे. दुधाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले असून पशुपालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. एकीकडे दुधाला मिळणारा दर आणि दुसरीकडे वाढता खर्च यांचा ताळमेळ बसवणे कठीण बनले आहे. या परिस्थितीत शासनाने तातडीने सुक्या चाऱ्याच्या उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पशुपालकांकडून केली जात आहे. अन्यथा येणाऱ्या काळात पशुपालन व्यवसाय मोठ्या संकटात सापडण्याची भीती व्यक्त होत आहे.

# दिव्यात सर्वंकष स्वच्छता मोहिमेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील सर्वच प्रभाग समिती हद्दीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. आज दिवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक ३३ मध्ये सर्वंकष स्वच्छता मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आली.सर्वंकष स्वच्छता मोहीम ही फक्त ठाणे शहरात मर्यादित न राहता ती महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक प्रभागात राबविली गेली पाहिजे या हेतूने महापौर पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी प्रत्येक आठवड्यात प्रभाग क्रमांक १ ते प्रभाग ३३ या ठिकाणी ही मोहीम राबविताना ठाणे शहर, दिवा, मुंब्रा, कळवा अशा पद्धतीने राबविण्याच्या सूचना घनकचरा व्यवस्थापन विभागाला दिल्या होत्या.त्यानुसार आज दिवा प्रभाग समिती ३३ अंतर्गत बाय जंक्शन ते कौसा तलाव तसेच चरणी पाडा रोड व परिसर येथे सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छतेची शपथ घेत या मोहिमेला सुरुवात करण्यात आली.दरम्यान घनकचरा व्यवस्थापन विभाग मार्फत १५० सफाई कर्मचारी व दोन जेटिंग गाडी, जेसीबी, डंपर लहान मोठ्या १० घंटागाड्या होते सदर मोहिमेंतर्गत एकूण १४ टन कचरा व माती उचलण्यात आले. तसेच रस्ते पाण्याने स्वच्छ धुण्यात आले. तसेच विविध ठिकाणी चिकटविण्यात आलेले जाहिरातीची पत्रके काढण्यात आली. स्वच्छता मोहिमेसाठी उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, फायलेरिया विभाग बांधकाम विभाग उपस्थित होते. तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत आरोग्य अधिकारी राणी शिंदे, मुख्य स्वच्छता निरीक्षक मयुरी वखारिया उपमुख्य स्वच्छता निरीक्षक डोगर परदेशीं. लक्ष्मण पुरी गौरी तांबे स्वच्छता निरिक्षक तसेच बांधकाम विभागाचे उप अभियंता सचिन कदम तसेच सामाजिक कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ठाण्यात पिकल बॉल कोर्टचे भव्य उद्घाटन

## सर्वसामान्यांसाठी नवे क्रीडांगण खुले



**संतोष पडवळ । ठाणे**

शहरात झपाट्याने लोकप्रिय होत असलेल्या पिकल बॉल या खेळाला चालना देण्यासाठी ठाणे पूर्व भागात नव्याने उभारण्यात आलेल्या पिकल बॉल कोर्टचे भव्य उद्घाटन आमदार संजय केळकर आणि कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते पार पडले. पीपल एज्युकेशन सोसायटी आणि द्रोणाचार्य क्रीडा अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.ठाण्यात यापूर्वी काही खाजगी पिकल बॉल कोर्ट उपलब्ध असले, तरी सर्वसामान्य खेळाडूंना सहज उपलब्ध होईल असे हे पहिलेच महत्त्वाचे कोर्ट मानले जात आहे. ठाणे पिकल बॉल असोसिएशनच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या या उपक्रमामुळे खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळणार आहेत.

उद्घाटन सोहळ्याला क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. पीपल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विद्याधर वैशंपायन, सचिव आल्हाद जोशी, ठाणे पिकल बॉल असोसिएशनचे अध्यक्ष मनोहर डुंबरे, सचिव सचिन मोरे, ॲड. सुभाष काळे, संस्थेचे संचालक श्री. भोळे, श्री. तुरुकमाने तसेच सौ. मेधा भंडारी यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.या नव्या कोर्टमुळे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पिकल बॉलसारख्या आधुनिक खेळात प्राविण्य मिळविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. भविष्यात अधिकाधिक युवा या खेळाकडे वळतील आणि व्यावसायिक स्तरावर संधी निर्माण होतील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सुविधा आणि सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. या नव्या क्रीडा सुविधेमुळे ठाणे पूर्व भागातील क्रीडा संस्कृतीला नवी उभारी मिळणार असल्याचे चित्र आहे.

# शिववैभव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची सुवर्ण झेप सुरुच; एका आर्थिक वर्षात ३५ कोटीं ठेवींची वाढ

**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

तालुक्यातील कुचांबे येथील शिववैभव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. यांनी दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर आपली आर्थिक स्थिती जाहीर केली असून संस्थेची सुवर्णझेप सुरूच असून संगमेश्वर तालुक्यातील ही पहिलीच पतसंस्था असून जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर राहून तिने आपली आर्थिक उलाढाल जाहीर करण्याचा मान मिळवला आहे.

संस्थेच्या अहवालानुसार, सभासदांची संख्या तब्बल १८,११५ इतकी झाली आहे. वसूल भागभांडवल ४ कोटी ०१ लाख, तर राखीव व इतर निधी ४ कोटी ९९ लाख इतका झाला आहे. संस्थेकडे एकूण ठेवी ११९ .३५ कोटी असून कर्ज वितरण ८७ कोटी १२ लाखांपर्यंत पोहोचले आहे.

तसेच, संस्थेचा एकूण व्यवसाय २०६ कोटी ४७ लाख इतका असून एकूण गुंतवणूक ४० कोटी १६ लाख इतकी आहे. स्वनिधी ७ कोटी ८८ लाख असून चालू आर्थिक वर्षात संस्थेला १ कोटी २० लाख इतका नफा झाला आहे. संस्थेचा सी.डी. रेशो ६६.६७ टक्के इतका नोंदवण्यात आला आहे.

संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमुळे परिसरातील सभासद, ठेवीदार आणि हितचिंतकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

३१ मार्च २०२५ ते ३१ मार्च २०२६ या आर्थिक वर्षात तब्बल ३५ कोटींची ठेवी वाढ झाली आहे. या यशाचे संपूर्ण श्रेय सभासद, ठेवीदार व कर्जदार यांना जाते. शासनाने घालून दिलेले सर्व रेशो पाळत संस्थेने १ कोटी २० लाख नफा मिळवला आहे. सभासद, ठेवीदार आणि कर्जदार यांच्या सहकार्यामुळेच ही प्रगती शक्य झाली,

असे संस्थेचे चेअरमन चार्टर्ड अकाउंटंट प्रकाश थेराडे व सेक्रेटरी संतोष थेराडे यांनी सांगितले. दरम्यान, संस्थेच्या वतीने सर्व सभासद, ठेवीदार, कर्मचारी व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत.



# ताम्हाने परिसरात विद्यार्थिनींचा पाठलाग करुन अश्लील कृत्य करणारा निघाला सरकारी कर्मचारी!

## देवरुख पंचायत समितीचा लिपिक पोलिसांच्या ताब्यात

**संगमेश्वर । प्रतिनिधी**




संगमेश्वर तालुक्यातील मठधामापूर परिसरात संगणक वर्गासाठी जाणाऱ्या चार अल्पवयीन विद्यार्थिनींचा पाठलाग करून, त्यांच्यासमोर अश्लील कृत्य केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी देवरुख पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत संशयित आरोपी हर्षल सुभाष गवंडी (वय २६, रा. पाटगाव) याला ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, संशयित आरोपी हा संगमेश्वर पंचायत समितीमध्ये लिपिक पदावर कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:३० ते १०:०० च्या सुमारास ही घटना घडली. पीडित विद्यार्थिनी देवरुख येथील संगणक वर्ग संपवून एस.टी. बसने ताम्हाणे फाटा येथे उतरल्या होत्या. तेथून त्या पायी मठधामापूर गुरववाडीकडे जात असताना, पिवळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या आरोपीने त्यांचा पाठलाग सुरू केला.मठधामापूर प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ आरोपीने आपली दुचाकी थांबवून आधी विद्यार्थिनींची टेहळणी केली. त्यानंतर काही अंतरावर पुन्हा विद्यार्थिनींच्या जवळ जाऊन चालत्या दुचाकीवर उभे राहून अश्लील कृत्य केले. या प्रकारामुळे घाबरलेल्या विद्यार्थिनींनी आरडाओरडा केला, मात्र तोपर्यंत आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता.या घटनेमुळे भयभीत झालेल्या विद्यार्थिनींनी घरी जाऊन पालकांना सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर पालकांनी धीर देत २ एप्रिल रोजी देवरुख पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ७८, ७९ आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (POCSO) २०१२ च्या कलम १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.देवरुख पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उदय झावरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आरोपी सरकारी कर्मचारी असल्याने या घटनेची परिसरात तीव्र चर्चा असून, महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# अभिजित दरेकर यांना 'द ग्रेट पत्रकारिता आयकॉन अवॉर्ड' प्रदान

**कर्जत । जयेश जाधव**



आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलन २०२६ हा भव्य सोहळा शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी महाड तालुक्यातील नडगाव तर्फे बीरवाडी येथील हॉटेल फाउंटन इन (लिमोनेट लीला) येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. कर्तृत्वाचा गौरव... रायगडचा अभिमान! या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कर्जत येथील पत्रकार अभिजित नारायण दरेकर यांना 'द ग्रेट पत्रकारिता आयकॉन अवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला. अभिजीत दरेकर यांनी पत्रकारिता क्षेत्रात प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि धाडसाने केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. ग्रामीण भागातील प्रश्न, सामाजिक समस्या आणि जनतेच्या अडचणी प्रभावीपणे मांडत त्यांनी पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.या कार्यक्रमात मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेते अजय तपकिरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. विनोदराव मोरे यांनी मार्गदर्शन करताना समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना अशा प्रकारच्या व्यासपीठातून प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करून करण्यात आली. रायगडच्या ऐतिहासिक वारशाची परंपरा आणि स्वराज्य मूल्यांची जपणूक करत समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याचा या संमेलनाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित शिशुविहार चिपळूण येथे किलबिल उन्हाळी शिबिराचा उत्साहात प्रारंभ

**चिपळूण । सत्यवान विचारे**




परशुराम एज्युकेशन सोसायटी, चिपळूण यांच्या परशुराम प्रबोधिनी विभागांतर्गत आयोजित किलबिल उन्हाळी शिबिराचा उद्घाटन समारंभ गुरुवार दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. हे शिबिर दिनांक ०२/०४/२०२६ ते ०९/०४/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सौ. आदिती फडणीस मॅडम यांच्या सुंदर स्वागतगीताने झाली.त्यांना गुरुकुल विभागाचे श्री.लघाटे सर यांनी पेटीची साथ देऊन वातावरण प्रसन्न केले. या उद्घाटनासाठी संस्थेचे कार्यवाह माननीय श्री. वाचासिद्ध सर तसेच शालेय समिती अध्यक्षा सौ.मंजुषा चितळे मॅडम ,शालेय समिती सदस्या सौ.सुरंगा अभ्यंकर मॅडम व सौ. सारिका भावे मॅडम, तसेच संकुलातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक,विभागप्रमुख तसेच पालक वर्ग उपस्थित होते.दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजन करून कार्यक्रमाला मंगलमय वातावरणात प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रश्मी कदम मॅडम यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या विभाग प्रमुख सौ.श्रुती रानडे मॅडम यांनी सादर केले. त्यांनी शिबिराचा उद्देश सांगून शिबिरात घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

यानंतर कार्यवाह मा.श्री वाचाविद्ध सर यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी सौ.समीक्षा शिगवण मॅडम यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला व संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# ऑर्थोपेडिक डॉक्टरांच्या कमतरतेमुळे विक्रोळीतील महात्मा फुले रुग्णालयात रुग्णांची गैरसोय

**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी कन्नमवार नगर येथील मुंबई महानगरपालिकेच्या क्रांतिज्योती महात्मा फुले सर्वसाधारण रुग्णालयात ऑर्थोपेडिक (अस्थिरोग) डॉक्टरांच्या कमतरतेमुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब समोर आली आहे.डॉ. योगेश भालेराव यांच्यासह दिशा वेल्फेअर ग्रुप आणि विक्रोळी विकास मंचच्या पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयाचे डीन डॉ. जाधव यांची भेट घेऊन सद्य परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी ऑर्थोपेडिक विभागातील एका डॉक्टरांनी नुकतेच राजीनामा दिल्याने सध्या केवळ एकच डॉक्टर उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली. दुसऱ्या डॉक्टरांच्या नियुक्तीसंदर्भात प्रक्रिया सुरू असल्याचेही सांगण्यात आले. डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिकेच्या धोरणानुसार डॉक्टरांची भरती ही कंत्राटी (Contract) पद्धतीने केली जाते. मोठ्या रुग्णालयांमध्ये मेडिकल



कॉलेज व प्राध्यापक उपलब्ध असल्याने सेवा सुरळीत चालते; मात्र छोट्या रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता भासल्यास रुग्णांना त्रास सहन करावा लागतो.तसेच, महानगरपालिका वर्षातून केवळ एकदाच सीएमएस (CMS )मार्फत कंत्राटी डॉक्टरांची भरती करते. त्या वेळी डॉक्टरांना आपल्या पसंतीचे रुग्णालय निवडण्याची मुभा असल्याने अनेक डॉक्टर सोयीस्कर ठिकाणे निवडतात, परिणामी काही रुग्णालयांमध्ये पदे रिक्त राहतात.दरम्यान, रुग्णालयात नूतनीकरणानंतर अत्याधुनिक आयसीयू तयार असूनही डॉक्टरांच्या अभावामुळे ते सुरू करता येत नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. क्रिकेट खेळण्यासाठी बॅट-बॉल आहे, पण खेळाडू नाहीत, अशी परिस्थिती असल्याचे उदाहरण यावेळी देण्यात आले.याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रस्तुतीगृह येथे सोनोग्राफी मशीन उपलब्ध नसून ते मिळण्यासाठी साधारणतः एक वर्षाचा कालावधी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. तोपर्यंत नागरिकांना अन्य ठिकाणी जावे लागणार असल्याने त्यांची फरफट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन रुग्णांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.या भेटीदरम्यान दिशा वेल्फेअर ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी, रविंद्र वाघमारे, जोहीब चुडावाला, राजन कोळी तसेच विक्रोळी विकास मंचचे अध्यक्ष संजय येवले, राजाराम राव, आयवन डिसोझा आदी उपस्थित होते.

# मराठी झी५ सादर करत आहे गाजलेली दमदार मराठी फिल्म-रुबाब

**ठाणे/नवी मुंबई । प्रतिनिधी**

यंदा वर्षाच्या सुरुवातीला चित्रपटगृहातील प्रदर्शनादरम्यान प्रेक्षकांसमोर झळकल्यानंतर, रुबाब मराठी झी५ वरील डिजिटल प्रीमिअरद्वारे व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. रॉमान्स, ड्रामा आणि इमोशन्स यांचे मिश्रण असलेला हा चित्रपट अभिमान, नातेसंबंध आणि आपण कोण आहोत हे ठरवणाऱ्या निवडीमध्ये रुजलेली कथा घेऊन येतो. आपल्या हृदयात, रुबाब ही कलाकृती सूरज आणि वैशालीच्या प्रवासाचे अनुसरण करतो. दोन प्रबळ इच्छाशक्ती असलेल्या व्यक्तींचे जीवन प्रेमाद्वारे एकत्र येते. परंतु परिस्थिती आणि स्वतःच्या भावनेची चाचणी घेतली जाते. त्यांचे नाते जसजसे विकसित होत जाते, तसतसा अभिमान, अहंकार आणि भावना मानवी संबंधांना कसे बळकट आणि आव्हान देऊ शकतात याचा शोध हा चित्रपट घेतो. प्रणय, ॲक्शन आणि भावनिक क्षणांची सरमिसळ असलेल्या रुबाबमध्ये आत्मसन्मान आणि ओळखीचे महत्त्व प्रतिबिंबित करताना नातेसंबंधांचे चढ-उतार टिपले जातात. संभाजी ससाणे, शीतल पाटील, विशाल शिरतोडे, अभिजीत साकते आणि सिमरन खेडकर यांच्या अभिनयासह या चित्रपटाला त्याच्या आकर्षक कथा आणि अभिनयासाठी चित्रपटगृहांमध्ये प्रशंसा मिळाली. त्याच्या डिजिटल प्रीमिअरद्वारे, रुबाब आता जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. मराठी कथाकथनास एका व्यापक व्यासपीठावर आणत आहे.झी५ वरील डिजिटल प्रीमिअरबद्दल बोलताना, झी मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी झी५ च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, रुबाब ही नात्यांची खरोखरच एक हृदयस्पर्शी कथा आहे - ही कथा आहे आपल्यासोबत नेहमी असणाऱ्या आत्मसन्मानाची, आपण जपलेल्या प्रेमाची आणि स्व'ला आकार




देणाऱ्या भावनांची. सांस्कृतिक पार्श्वभूमीवर आधारित चित्रपटाची कथा आपलीशी आणि घराच्या जवळची वाटते. मराठी चित्रपटाला परिभाषित करणारा प्रामाणिकपणा आणि अस्सलता यात प्रतिबिंबित होते. तसेच मराठी झी५ च्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर ही शक्तिशाली कथा उलगडल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो.दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे म्हणाले, रुबाब ही प्रेम, आत्मसन्मान, भावना आणि अहंकाराची टक्कर झाल्यावर लोक करतात त्या निवडीविषयीची कथा आहे. ही एक कथा अतिशय वास्तविक वातावरणातून उत्पन्न झालेली असून प्रेक्षकांना चित्रपटगृहांमध्ये आपलीशी वाटली, हे विशेष आहे. हा चित्रपट आता मराठी झी५ वर अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल याचा मला आनंद वाटतो.

संभाजी सासणे पुढे म्हणाले, सूरजची भूमिका साकारणे हा एक अतिशय मनोरंजक अनुभव होता. कारण त्यात आत्मविश्वास आणि असुरक्षितता दोन्ही आहेत. ही कथा अनेक लोकांच्या भावना प्रतिबिंबित करते आणि मला आनंद आहे की जागतिक स्तरावरील प्रेक्षकांना आता मराठी झी५ वर रुबाब पाहण्याची संधी मिळेल. आम्ही त्याची आतुरतेने वाट पाहत आहोत.

शीतल पाटील म्हणाली, वैशाली ही एक मजबूत आणि स्वतंत्र व्यक्तिरेखा असून तिच्या भूमिकेवर ठाम आहे आणि म्हणूनच मी या भूमिकेकडे आकर्षित झाले. रुबाब नातेसंबंधांमधील भावनिक पदर सुंदरपणे टिपतो. या प्रवासाचा एक भाग असणे खरोखरच विशेष आहे.

रॉमान्स, ड्रामा आणि संबंधित कथाकथनाच्या मिश्रणासह, रुबाब सर्व वयोगटातील प्रेक्षकांसमोर गुंतवणाऱ्या कलाकृतीचे वचन देते.

रुबाब'चा डिजिटल प्रीमियर चुकवू नका, लवकरच केवळ मराठी झी५ वर!

# पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया संघटनेच्या वतीने गुणवंतांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव

**कर्जत । प्रतिनिधी**

दर वर्षा प्रमाणेच या ही वर्षी आज दि ०३ मार्च २०२६ रोजी कर्जत येथील कार्यालयात पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली या संघटनेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा समाजभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले.

आपल्या हातून समाजात अनेक चांगल्या गोष्टी घडत आहेत , अश्या मान्यवरांना आपल्या समाज कार्याची दखल घेऊन कर्जत येथील प्रदेश कार्यालय येथे समाज भूषण२०२६ पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी समाज भूषण पुरस्कार सचिन बुवा लोंगले यांनी मान्यवरांचे स्वागत केले व पुरस्कारकर्ते यांच्या कार्याची माहिती सांगून पुढील कार्यक्रम सुरू करण्यात आला.

या वेळी भजन, किर्तन, गायन, संगीत, विशारद, पवाडा, समाजसेवक. भावगीत भक्तीगीत, ढोलकी वादक, कलगीतुरा, हरिपाठ प्रवचन, समाज प्रबोधन, खालू बाजा सनई, पत्रकार या क्षेत्रातील विविध मान्यवरांचा सत्कार पोलीस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली या संघटनेच्या वतीने यावर्षी २०२६ समाज भूषण पुरस्कार याने सन्मानित करण्यात आले.

यामध्ये १). तानाजी शंकर मसने (संगीत विशारद) मु तळवडे २) भास्कर शंकर मसने (मृदंग वादक तबला वादक)३) अमोल आत्माराम पाटील



मु. पेझारी ,पोयनाड (भजनी गायक भावगीत भक्ती गीत)४) आकाश दत्तात्रय काटे मुं.नेरल ( मृदुंग वादक तबला, ढोलकी वादक)
५) आशिष कमलाकर हातचागे . मु. खामदे, मुरुड जंजिरा. (संगीत विशारद ,भजन ,कलगीतुरा)
६) उद्देश धर्मा तलेकर. मु. मृतखार मुरुड.(वादक ढोलकी तबला खालुबाजा सनई) ७) नरेंद्र महाराज दादा पाटील मु.पिंपळोली कर्जत (किर्तन हरिपाठ प्रवचन समाज प्रबोधन )८) गणेश मारुती भोपी. मु.बदलापूर. (सामाजिक कार्यकर्ते समाजसुधारक)९) श्री अनिल तुकाराम गावडे .मु.वडाला मुंबई.(तबला ढोलकी विशारद)
१०) जैतूबुवा गोपाल कराले. मु.बेकरे (भजन . संगीत समाजसेवक)११) जयेश जाधव संपादक कर्जत प्रभात मु.कर्जत.(प्रसिद्धी प्रमुख पत्रकार) १२) राहुल गायकवाड कर्जत पोलीस स्टेशन डी वाय एस पी.आदीघा समावेश होता.

यावेळी अ पोलिस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष श्री डॉ. ज्ञानेश्वर सालोखे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. किशोर शितोळे, प्रदेश कमिटी अध्यक्ष रतन लोंगले,ज्येष्ठ पत्रकार व आगरी समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे, कर्जत लाईव्ह युट्यूब चैनल रायगड भूषण किशोर गायकवाड, जिल्हा युवक अध्यक्ष प्रफुल जाधव.पोलीस पाटील गणपत वाघमारे, समाजभूषण पुरस्कार सचिन बुवा लोंगले. त्याच प्रमाणे अनेक मान्यवर उपस्थित होते.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)